Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## :: परिपत्रक ::

**विषय :** पीएचडी परीक्षेच्या कार्यवलनाबाबत...

रिसर्च ॲण्ड पब्लिकेशन इथिक्स तसेच प्री-पीएचडी कोर्सवर्क सैध्दांतिक परीक्षेबाबत विहीत कार्यवाही करण्याकरिता पीजीबीयुटीआर व परीक्षा विभागाकडून वारंवार निर्देशन केले जाते, हे आपणांस विदीत आहेच.

विद्यापीठ अधिविभागांना परीक्षा विभागाशी निगडीत काही अडचणी असल्यास त्या परीक्षा विभागाशी चर्चा अथवा पत्रव्यवहार करुन सोडविणे क्रमप्राप्त आहे. विहीत कार्यालयीन प्रक्रिया न राबविता अथवा परीक्षा विभागाशी चर्चाविनिमय/पत्रव्यवहार न करता थेट मा. कुलगुरू यांची मान्यता घेवून प्रकरण पुढील कार्यवाहीकरिता परीक्षा विभागाकडे देणे, हे कार्यालयीन प्रक्रियेला छेद देणारे आहे.

सबब, आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, भविष्यात पीएचडी परीक्षांच्या अनुषंगाने पीजीबीयुटीआर विभागाकडून दिलेल्या निर्देशांप्रमाणे तसेच परीक्षा विभागामधील कामकाजाच्या अनुषंगाने दिलेल्या निर्देशांनुसार कार्यवाही करणे अभिप्रेत असताना सदर कार्यवलन पध्दतीस बगल देत मा. कुलगुरू यांची परस्पर मान्यता घेण्यात येऊ नये. याबाबत सर्व संबंधितांनी गांभीर्याने दखल घ्यावी.

डॉ. अजितसिंह जाधव
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

बीएस्सी-एमएस्सी परीक्षा विभाग/
दि. १८.०७.२०२६

प्रत,
मा. अधिविभागप्रमुख/मा.समन्वयक,
संबंधित सर्व अधिविभाग/संशोधन केंद्रे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

इंटरनेट सेल : विद्यापीठ संकेतस्थळावर Exam Circular येथे प्रकाशित करावे. (प्रसारण कालावधी - सदरचे परिपत्रक वारंवार निदर्शनास येणे अपेक्षित असल्याने कायमस्वरूपी)